ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 63
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आं.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १७ डिसेंबर, १९५२ अंक ४८

## विविध माहिती

**सीलोनच्या सरकारसाठीं नाणीं**—भारतीय टांकसाळींत सीलोनसाठी नाणीं पाडण्याचें भारतीय सरकारनें कबूल केलें असल्याचें लोकसभेंत सांगण्यांत आलें. १९५१ व १९५२ सालीं सीलोनला भारतानें ५० सेंट, २५ सेंट, १० सेंट आणि २ सेंटचीं नाणीं पाडून दिलीं.

**अतिपूर्वेकडील देशांना मदत**—१९५२ च्या शेवटच्या तिमाहींत अमेरिकेच्या म्युच्युअल सिक्युरिटी एजन्सीतर्फे ५,४७,००,००० डॉलर्स रक्कम इंडोचायना, फोर्मोसा, फिलिपाइन्स व सयाम ह्या देशांना देण्यांत आली. इंडोचायना व फिलिपाइन्स ह्या देशांना प्रत्येकीं १ कोटी डॉलर्स, फोर्मोसाला ३,२८,००,००० डॉलर्स आणि इंडोचायनाला २० लाख डॉलर्स मिळाले.

**जगाची लोकसंख्या किती ?**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे करण्यांत आलेल्या अंदाजाप्रमाणें जगाची लोकसंख्या १९४९ सालीं २,३६,७७,३७,००० होती. आज ती २,५०,००,००,००० इतकी आहे, असा कयास करण्यांत आला आहे.

**पेकिंग येथें हिंदी प्राध्यापक**—पेकिंग येथील राष्ट्रीय विद्यापीठांत श्री. बी. सी. वर्मा ह्यांची हिंदीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. श्री. वर्मा हे लवकरच पेकिंग येथें आपल्या कामावर रुजू होतील. त्याचे वय २५ वर्षांचें आहे. चीन व भारत ह्यांच्या परस्पर संबंधावर ते एक प्रबंध लिहीत आहेत. चिनी विद्यापीठांत भारतीय प्राध्यापकाची नेमणूक झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**मध्य-प्रदेशांतील तुरीचें उत्पादन**—गेल्या हंगामांत मध्यप्रदेशांत ५,३२,००० टन तुरीचें उत्पादन झालें. त्याची किंमत सुमारें २० कोटी रुपये झाली. तूर आणि तिच्याबरोबर लागवड करण्याच्या पिकांचें, मध्यप्रदेशांतील क्षेत्र अंदाजें ५५ लाख एकर आहे. तुरीची लागवड, कापूस आणि ज्वारी ह्यांच्याबरोबरच करण्यांत येते.

**इंडियन सायन्स कॉंग्रेस**—इंडियन सायन्स कॉंग्रेसचें ४० वें अधिवेशन लखनौ येथें २ जानेवारी, १९५३ रोजीं भरणार आहे. अधिवेशनाचे अध्यक्ष बोस रिसर्च इन्स्टिट्यूट, कलकत्ता ह्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. डी. एन्. बोस हे आहेत. उद्घाटन पं. जवाहरलाल नेहरू करणार आहेत.

**ब्रिटनचें पोलादाचें उत्पादन**—ब्रिटनमधील पोलादाचे कारखाने सध्यां दरवर्षी १,७९,५१,००० टन ह्या गतीनें पोलादाचें उत्पादन करीत आहेत.

**फ्रान्स ब्राझिलचा कापूस घेणार**—योग्य किंमतीला मिळाल्यास फ्रान्स ब्राझिलकडून १९५२–५३ च्या हंगामांतील ३०,००० ते ४०,००० गांसडचा कापूस घेणार आहे. फ्रान्सचें व्यापारी प्रतिनिधी मंडळ सौदा पटविण्यासाठी नुकतेच ब्राझिलला गेलें आहे. उभयता राष्ट्रांत पूर्वी झालेल्या कराराची मुदत गेल्या ऑक्टोबरमध्यें संपली.

**आयातीवर निर्बंध**—इजिप्तच्या मंत्रिमंडळानें पौंडी गटांतील देशांकडून फक्त जरुरीच्याच वस्तू आयात करण्याचीं बंधनें घातलीं आहेत. इजिप्तचा पौंडांचा साठा सुधारेपर्यंत हें धोरण चालू राहील, असें समजतें.

**कलकत्ता येथें तागाची प्रयोगशाळा**—तागाच्या व बटाट्याच्या पिकांवर पडणाऱ्या किडीचें निवारण करण्यासाठी हुगळी जिल्ह्यांत सिनगूर येथें एक रासायनिक प्रयोगशाळा काढण्यांत येणार आहे. ही प्रयोगशाळा प. बंगाल सरकार आणि इंडियन ज्यूट कमिटी ह्यांनीं संयुक्तपणें पुरस्कारलेली आहे.

**कागद करण्यास पुरेसें लांकूड**—पू. पंजाब, हिमाचल व उत्तरप्रदेश राज्यांतील जंगलांत कागद करण्यासाठीं लागणारें लांकूड भरपूर प्रमाणांत उपलब्ध होईल, अशी माहिती संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे जाहीर करण्यांत आली आहे. संघटनेनें आशिआ-पॅसिफिक फॉरेस्ट्री कमिशन नेमलें होतें. दरवर्षी १,००,००० टन लांकूड मिळूं शकेल असा अंदाज आहे.

**धान्याच्या दुकानांकडून अनामत रक्कम**—बिहार सरकारनें योग्य किंमत घेऊन धान्याचीं दुकानें चालविणाऱ्या दुकानदारांकडून २५० रुपयांची अनामत रक्कम घेण्याचें ठरविलें आहे. ह्या दुकानदारांनीं नियमाविरुद्ध वर्तन केल्यास रक्कम जप्त करण्यांत येणार आहे.

**अणुस्फोटाचा चित्रपट**—ब्रिटिश सरकारनें ऑस्ट्रेलिआजवळ आपल्या पहिल्या अणुबॉंबचा स्फोट केला. त्याप्रसंगीं घेण्यांत आलेल्या चित्रपटाचा कांहीं भाग आतां जगभर दाखविण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

**राजे फरूक यांच्या मोटारगाड्या**—इजिप्तचे पदच्युत राजे फरूक ह्यांच्या मालकीच्या १२ रोल्स रॉइस, ३१ कॅडिलॅक्स, २ लिंकन्स, २३ मरक्युरी व ७ पॅकार्ड इतक्या गाड्या होत्या. त्याशिवाय बंदुकीच्या गोळ्यापासून बचाव करणारी 'मर्सिडिज' बनावटीची गाडी हिटलरनें त्यांना दिली होती. सर्व गाड्या आतां विकण्यासाठी काढण्यांत आल्या आहेत, त्या परकीयांनाहि घेतां येतील.

### किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९५२ अखेर संपलेल्या वर्षी ६,६५,७६१ रु. घसारा काढून आणि ५,००,००० रु. कराची तरतूद करून १,३७,०२७ रु. निव्वळ नफा मिळविला. शेतकऱ्यांची क्रयशक्ति कमी झाल्यामुळें कारखान्याच्या मालाची मागणी उतरली. त्यांचेकडून नव्या मागण्या येण्याचें बंद झालें, इतकेंच नव्हे तर अगोदरच्या ऑर्डरी रद्द करण्याची त्यांना पाळी आली. ही मंदी अद्याप कायम आहे. धंद्याची ही परिस्थिति लक्षांत घेऊन मॅनेजिंग एजंटांनीं त्यांचा ऑफिस अलावन्स ( १८,००० रु. ) सोडून दिला, त्याबद्दल डायरेक्टरांनीं त्यांचे आभार मानले आहेत. भागीदारांना ६% डिव्हिडंड देण्यांत आलें, त्यास १,३६,१२९ रु. लागले. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर एवढ्या कमी दरानें डिव्हिडंड कोणत्याच वर्षी देण्यांत आलें नव्हतें आणि १९२०-२१ ते १९५०-५१ अखेरची वार्षिक डिव्हिडंडची सरासरी ७·१८% होती. कंपनीचें वसूल भांडवल १५,५२,६९७ रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ४५,१५,१२४ रुपयांचे आहेत. इन्कमटॅक्सची तरतूद २८,००,००० रु. असून ग्रॅच्युइटीची तरतूद ४,०५,८५५ रु. ची आहे. घसारा फंड ३८,४८, ४८८ रु. चा आहे. एकूण ताळेबंद १,५७,५९,०५० रु. चा आहे आणि त्याचा तपशील कंपनीची परिस्थिति मजबूत असल्याचें दर्शवितो.

---

### लंडनमध्यें भरणारें एक अभिनव प्रदर्शन

लंडनमध्यें येत्या मार्च महिन्यांत एक अभिनव प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. हें प्रदर्शन म्हणजे खेळण्याच्या पत्त्यांचें होय. प्रदर्शन भरविण्याचा पुढाकार मि. विल्यम पेन नांवाच्या गृहस्थांनीं घेतला असून तें २ आठवडे चालेल. ह्या प्रदर्शनांत निरनिराळ्या २४ देशांतील ४०० पत्त्यांचे जोड ठेवण्यांत येणार आहेत. त्यांत जपान, चीन व भारतामधील कांहीं जोडहि दिसतील. प्रदर्शनांत ३०० वर्षांपूर्वींचे कांहीं जोड असल्यामुळें प्रस्तुत प्रकारच्या करमणुकीचा एक मनोरंजक इतिहासच तेथें बघण्यास मिळेल. अगदीं प्रथम पत्त्यांचा उपयोग भविष्यकथनासाठीं करीत असत. प्राथमिक स्वरूपाच्या अशा पत्त्यांचा नमुनाहि प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहे. अगदीं अलीकडील अमेरिकन पद्धतीचे जोडहि त्यांत दिसतील. पत्त्यांच्या डावाची विभागणी निरनिराळ्या प्रकारांत करण्यांत आली आहे. कांहीं ऐतिहासिक महत्त्वाचे, कांहीं शैक्षणिक महत्त्वाचे, कांहीं भविष्यकथनासाठीं तयार केलेले व कांहीं पौर्वात्य देशांतच सांपडणारे असे हे डाव आहेत. भारतांतील गंजिफा प्रदर्शनांत ठेवण्यांत येतील. गंजिफा आतां त्या निघालेल्या मूळच्या देशांतहि फारशा दिसत नाहींत. चीनमधील चिंचोळ्या आकाराचे पत्त्यांचे डाव म्हणजे एक कुतूहलच आहे. मि. पेन हे मोठे हौशी व संशोधक वृत्तीचे गृहस्थ दिसतात. त्यांच्याजवळ पत्त्याच्या खेळाविषयीं लिहिलेल्या गेल्या १५० वर्षांतील पुस्तकांचा एक संग्रहहि आहे. त्याशिवाय अशा कांहीं वस्तू आहेत कीं, त्यांच्यावर पत्त्यांच्या आकृति अगर तत्संबंधी कांहीं माहिती कोरलेली आहे. करमणुकीचे प्रकार अलिकडे खूपच वाढले असले तरी त्यांत पत्त्यांना अजूनहि स्थान आहे. करमणुकीच्या एका प्रकाराचे ऐतिहासिक संग्रहालय म्हणून प्रदर्शन नावीन्यपूर्ण ठरेल असें वाटतें.

---

### अन्नधान्याचें उत्पादन व खप

भारतांतील दर माणशीं धान्यउत्पादन ३५८ पौंड आहे पण दर माणशीं उठाव मात्र ३७८ पौंड आहे.


दि

## युनायटेड कमर्शिअल बॅंक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | १ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बॅंकेच्या शाखा असल्यानें आणि बॅंकेच्या संबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बॅंकिंगची सेवा करण्यास बॅंक सुसज्ज आहे.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बॅंक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बॅंक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४ ,९१५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८३,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बॅंक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. १७ डिसेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची तरतूद

### निष्ठुर काटकसरीची आवश्यकता

पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं ८ डिसेंबर रोजीं पार्लमेंटच्या दोन्हीं सभागृहांस पहिली पंचवार्षिक योजना सादर केली. नियोजन मंडळानें जुलै १९५१ मध्यें योजनेचा कच्चा आराखडा तयार केला होता, त्यावर नागरिकांना व प्रातिनिधिक संस्थांना मत प्रदर्शित करण्याची संधि देण्यांत आली होती. पक्क्या योजनेच्या पहिल्या भागांत अविकसित अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या कार्याचें विश्लेषण असून, ज्यासाठीं राष्ट्रीय प्रयत्न करावयाचा आहे तीं दीर्घकालीन लक्ष्यें त्यांत सांगितलीं आहेत. ह्याचे अखेरीस पंचवार्षिक योजना व तिनें साध्य व्हावयाच्या गोष्टी यांचा गोषवारा दिला आहे. अहवालाच्या दुसऱ्या भागांत कारभार व जनतेचें सहकार्य यांचा विचार केला आहे. तिसऱ्या भागांत निरनिराळ्या विकास योजनांचे आराखडे दिले आहेत. त्यांची पुढील तीन व्यापक गटांमध्यें गटवारी केली आहे. (१) शेतकी, पाटबंधारे व सामाजिक विकास, (२) उद्योगधंदे व दळणवळण आणि (३) सामाजिक स्वरूपाचीं कार्यें व रोजगारी. विकासाच्या प्रत्येक अंगाचा निराळा विचार करून त्याच्या गरजा व साधनसामुग्री यांचें मूल्यमापन केलें आहे व त्यासंबंधींचें धोरण व कृति यावर मंडळानें आपल्या सूचना दिल्या आहेत. पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या प्रमुख विकासयोजनांचा तपशील एका निराळ्या पुस्तकांत दिला आहे.

आतां सादर केलेल्या योजनेंत कच्च्या आराखड्यांतील सर्व विकासयोजना आहेतच, पण शिवाय पुष्कळशी भरही घालण्यांत आली असून कांहीं बदलही केलेले आहेत. कच्च्या मसुद्यांत केलेल्या सूचना देशाच्या गरजेपेक्षा कमी आहेत असें ज्या ठिकाणीं वाटलें तेथेंच असे बदल योजना भक्कम करण्याचे दृष्टीनें केले आहेत.

भांडवल-गुंतवणीच्या एकूण कार्यक्रमांतही पुष्कळ बदल केला आहे. कच्च्या मसुद्याप्रमाणें योजनेचे दोन भाग असून पहिल्या भागासाठीं ३०० कोटी रु. खर्च धरला होता. हा खर्च परदेशी मदतीवर अवलंबून होता. अखेरच्या अहवालांत योजनेचे असे दोन भाग पाडलेले नाहींत. निरनिराळे कार्यक्रम आतां एकाच योजनेखालीं आणले असून त्याचा एकूण अंदाजीं खर्च २,०६९ कोटी रुपये धरला आहे.

**विकासाच्या मुख्य बाबींवर योजना व कच्चा मसुदा यांत धरलेले खर्चाचे तुलनात्मक आंकडे पुढे दिले आहेत. खर्चाची रक्कम १४९३ कोटींवरून २०६९ कोटी रु. पर्यंत वाढविण्यांत आली आहे. ही वाढ कोणत्या सदरांत कसकशी करण्यांत आली आहे, हें खालील तक्त्यावरून स्पष्ट होईलच. शेतकी व विकासयोजना, पाटबंधारे, वीज, उद्योगधंदे, सामाजिक कार्य,** ह्यांच्यावरील खर्चाचा वांटा वाढविण्यांत आला आहे. ह्या सर्वांचा परिणाम राष्ट्रीय उत्पन्नांत ११% वाढ होण्यांत होईल अशी अपेक्षा आहे. योजनेंतील २०६९ कोटी रुपयांपैकीं ३६५ कोटी रुपये आतांच खर्च झालेले आहेत. मुख्य प्रश्न पंचवार्षिक योजनेस लागणारा पैसा कसा उभारावयाचा, हा आहे. खर्चाची रक्कम ही किमान असून, तीहि मिळण्याची अडचण आहे आणि २९० कोटी रुपयांच्या नोटा सिक्युरिटी प्रेसमधून छापून घेऊन खर्चाची तोंडमिळवणी करावी लागेल, असा आजचाच अंदाज आहे. त्यामुळें किंमतींचें मान बिघडेल हें उघड आहे. करवाढ किंवा कर्ज-उभारणी ह्यांस अत्यंत मर्यादित वाव आहे आणि सरकारनें निष्ठुरपणें काटकसर केली आणि लोकांच्या रहाणीचें मान त्यांच्याच अंतिम हिताच्या दृष्टीनें त्यांचें सहकार्य संपादून मुद्दाम उतरविलें, तरच पंचवार्षिक योजनेचा खर्च भागूं शकेल. मागासलेल्या देशांत अशा प्रकारच्या अडचणी येणें अपरिहार्य आहे; तेव्हां योजना पुरेशी दूरगामी नाहीं असें म्हणण्यापेक्षा आहे त्या योजनेच्या पूर्ततेसाहि पुरेसा पैसा मिळणें कठीण आहे, हें म्हणणें अधिक खरें होईल. म्हणूनच, विचारवंतांनीं आंखलेल्या मर्यादित पंचवार्षिक योजनेच्या यशास साहाय्यभूत होईल असेंच धोरण ठेवणें देशहिताचें ठरेल.

| | १९५१–५६ कालांतील खर्च | | एकूण खर्चाच्या किती टक्के | |
|---|---|---|---|---|
| | पंचवार्षिक योजना | कच्चा मसुदा | पंचवार्षिक योजना | कच्चा मसुदा |
| | कोटी रु. | कोटी रु. | | |
| शेतकी व समाजविकास | ३६०·४३ | १९१·६९ | १७·४ | १३·८ |
| पाटबंधारे व वीज | ५६१·४१ | ४५०·३६ | ३०·२ | २०·२ |
| वाहतुक व दळणवळण | ४९७·१० | ३८८·१२ | २३·६ | २६·१ |
| उद्योगधंदे | १७३·०४ | १००·९९ | ८.४ | ६·७ |
| सामाजिक कार्य | ३३९·८१ | २५४·२२ | १७·० | १६·८ |
| पुनर्वसाहत | ८५·०० | ७९·०० | ४·१ | ५·३ |
| इतर | ५१·९९ | २८·५४ | २·५ | १·९ |
| | २०६८·७८ | १४९२.९२ | १००·० | १००·० |

### राजस्थान सरकारपुढें आर्थिक पेचप्रसंग

राजस्थान राज्याची आर्थिक परिस्थिति बरीच बिघडली आहे. राज्याच्या स्थापनेपासूनच राजस्थानच्या अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी होऊं शकलेली नाहीं. त्याचेजवळील सरकारी रोख्यांच्या तारणावर मिळेल तेवढें कर्ज त्यानें घेऊन खर्चलें आहे आणि चालू खर्चासाठीं आणि पगार भागविण्यासाठीं सरकारी ट्रेझऱ्यांचें काम करणाऱ्या जयपूर, बिकानेर आणि राजस्थान ह्या तीन बँकांकडून कर्ज काढलीं आहेत. राजस्थान सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ३ कोटी रुपयांची देणगी मागितली आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### ब्रँच बँकिंग व युनिट बँकिंग

"अर्था"च्या १० डिसेंबरच्या अंकांतील महाराष्ट्रीय बँकांच्या एकत्रीकरणावरील अग्रलेख आस्थापूर्वक वाचला. ३० नोव्हेंबर रोजीं पुणें येथें ह्या प्रश्नावर मी जे विचार व्यक्त केले, ते आपण ह्या लेखांत बिनचूक निवेदले आहेत. एक गोष्ट मात्र राहिली आहे. भारतांत, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांत, ब्रँच बँकिंग आणि युनिट बँकिंग ह्या दोन्हींसहि वाव आहे, असें त्या भाषणांत मी स्पष्ट म्हटलें होतें, त्याचा आपल्या लेखांत उल्लेख झालेला नाहीं. अर्थात्, आतां त्यापासून विशेष कांहीं बिघडलें, असें नाहीं. आपल्या पूज्य पित्यांचें उत्कृष्ट कार्य आपण पुढें चालवीत आहां, हें पाहून मला अतिशय आनंद वाटतो.":—**डॉ. जी. एस. पाणंदीकर, एम. ए., पीएच्. डी.**

---

### उद्यांच्या बँकिंगची दिशा

(१)

"उद्यांच्या बँकिंगची दिशा" हा आपला लेख वाचून अत्यंत आनंद झाला. इतका उपयुक्त लेख ह्या विषयावर मराठींत आतां-पर्यंत लिहिला गेला असेल, असें आम्हांस वाटत नाहीं:—**श्री. एल. एन. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., मॅनेजर, दि रत्नाकर बँक, लि.**

(२)

"आपला लेख सहजसुंदर व परिपूर्ण असा आहे. त्यामधील विचार उत्कृष्ट असून विधायक आहेत. त्याबद्दल आपलें मनःपूर्वक अभिनंदन. आपले हे विचार इंग्रजी प्रमुख नियत-कालिकांत प्रसिद्ध व्हावेत, अशी सूचना आहे.":—**ग. र. तुळशीबागवाले, बी. ए., एलएल्. बी., माजी चेअरमन, पुणें सें. को. बँक लि.**

---

### बँकिंग क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचें उद्बोधक मार्गदर्शन

"आपल्या तारीख १० डिसेंबर, १९५२ चे अंकांतील 'महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण—चर्चेचा समारोप' हा अग्रलेख व त्यांत उद्धृत केलेलीं डॉ. जी. एस्. पाणंदीकर, प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. वामनराव वर्दे या तज्ज्ञांचीं मतें व विचार वाचले. आपले साप्ताहिकांत या विषयावर गेले सहा आठवडे विचारपरिप्लुत साधक-बाधक चर्चा—तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध करून बँकिंग क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना उद्बोधक मार्गदर्शन करण्याची बहुमोल कामगिरी आपण अत्यंत कुशलतेनें बजाविली आहे, याबद्दल शंका नाहीं.

"भारतांतील अर्थव्यवस्था ही जवळजवळ रिझर्व्ह बँकेच्या नियोजन कक्षेंतील ताब असल्यामुळें, देशांतील 'बँकिंग' धंदा-संबंधीचें धोरण रिझर्व्ह बँक स्पष्ट करीपर्यंत बँकिंग क्षेत्रांत कोणतीहि नवी योजना हातीं घेऊन तिचा स्वतंत्र पाठपुरावा करणें श्रेयस्कर होणार नाहीं. महाराष्ट्रीय बँकांनीं तूर्त एकमेकांच्या प्रभावी सहकार्यानें (Co-ordination) प्रामुख्यानें ठेवेदार व भागीदार यांचे हितसंबंध दक्षतेनें व निर्दोषपणें सुरक्षित ठेवून आपली स्वतःची मजबुती वाढवून आपआपले क्षेत्रांत जास्त कार्यक्षम होण्याचा प्रयत्न करणें, हेंच उचित होय.

"श्री. जोग यांचे 'महाराष्ट्रीय बँकांना विनंती' या लेखानें 'बँकांचें एकत्रीकरण'-या-विषयास चालना मिळून बँकिंग क्षेत्रांतील तज्ज्ञांचें मार्गदर्शन लाभलें याबद्दल श्री. जोग यांचे आभार मानणें उचितच होईल. आपल्या 'अर्थ' विषयास वाहून घेतलेल्या साप्ता-हिकांत 'बँकिंग' विषयाची उच्च भूमिका कायम ठेवून तज्ज्ञांचे विचारप्रवाह एकत्र आणून महत्त्वाचे विषयास योग्य मार्गदर्शन केलेत, याबद्दल आपलेहि आभार मानून हें पत्र पुरें करतों. महाराष्ट्रांतील बँकिंग क्षेत्रांतील इतर मंडळींची भावनाहि माझ्या-सारखीच आहे, ह्या विश्वासानेंच हें पत्र लिहीत आहें.":—**नि. ना. क्षीरसागर, मॅ. डायरेक्टर, भारत इंडस्ट्रिअल बँक लि.**

---

### जागतिक बँकेच्या कर्जाचा विनियोग

इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटचा ७ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून बँकेनें दिलेल्या कर्जांची वर्गवारी दिसून येते. प्रारंभीं बँकेनें युरोपच्या युद्धोत्तर पुनर्घटनेकडे लक्ष देणें स्वाभाविक होतें. हीं कर्जे वगळलीं, तर बँकेच्या उरलेल्या एकूण कर्जांपैकीं मोठा भाग पश्चिम गोलार्धां-तील देशांना मिळालेला आहे. अमेरिका खंडांतील देशांना ३३ कोटी डॉलर्स मिळाले, युरोपच्या वांट्यास २० कोटि डॉलर्स आले, ऑस्ट्रेलियास १० कोटि डॉलर्स मिळाले, आफ्रिकेंतील देशांनीं १२½ कोटि डॉलर्स उचलले आणि आशिया व मध्यपूर्व ह्यांतील सर्व देशांना मिळून १३ कोटि डॉलर्स मिळूं शकले. अमेरिकन देशांनीं कर्जाचा विनियोग मुख्यतः वीजशक्तीच्या वाढीकडे केला, युरोपीय देशांनीं कारखाने सुधारले, आफ्रिकन देशांनीं कर्जाची निम्मी रक्कम वीजउत्पादनाकडे वापरली, आशिया व मध्यपूर्व येथें कर्जाचा मोठा भाग वहातुक सुधारण्याकडे खर्च होत आहे. बँकेच्या कर्जानें वीज उत्पादन, वहातूक सुधारणा, ह्यांचीच प्रगति मुख्यतः होत आहे.

---


# WANTED

Applications are invited for the post of the Manager of the Poona District Co-operative Purchase and Sale Union Ltd., Poona carrying the scale of Rs. 100-10-200 plus D. A. as may be fixed from time to time.

Applicant should not be more than 40 years of age and should be conversant with the keeping of Accounts of various nature of trades and should have good knowledge of English and Marathi.

Preference will be given to B. Coms. or persons holding higher Diploma in Co-operation or persons having a good deal of experience of working of Co-operative Purchase and Sale Unions.

Candidates called for interview will have to appear at their own expenses. The applications should be addressed to the undersigned by name and should reach him on or before 27-12-1952.

The applicants are advised to send their applications by Registered Post A. D., as no separate acknowledgment will be given.

Sd/- **Y. D. KHOLE.**

12th December, 1952.
125, Bhawani Peth,
POONA 2.

*Chairman,*
The Poona Dist. Co-op.
Purchase & Sale Union
Ltd., Poona 2.

# दुष्काळ-पीडा : रोगाचें मूळ व निदान :

## खेडेगांवांतील सामाजिक परिस्थिति.

( लेखक.—न. स. जोशी, रि. सु. इंजिनिअर. )

आतांपर्यंत चर्चारूपानें, तसेंच सोलापूरचें प्रत्यक्ष उदाहरण घेऊन, दाखविलें आहे कीं निवळ कालवे काढून दुष्काळ निवारण होत नाहीं हें तर खरेंच; परंतु योग्य प्रकार ( Pattern ) चें, अर्थात् फक्त धान्योत्पादन होईल असले कालवे काढले तरी तेवढ्यानें सुद्धां उद्दिष्ट साध्य होत नाहीं.* "दुष्काळ" शब्दानें आपली फसगत होते; व्यवहारांत आपण त्याचा अर्थ 'धान्यतूट' म्हणून समजतों, पण प्रत्यक्षांत "बिगर-जमीन खेडूत जनतेला ज्या त्या खेड्यांत धान्य असून मिळूं शकत नाहीं," असाच त्याचा खरा अर्थ असतो.

हें विवेचन नीट कळण्यास खेडेगांवांतील जनतेची सामाजिक विभागणी कशी व कोणत्या प्रकारची असते, तें नीट समजलें पाहिजे. तें समजावून सांगण्याच्या उद्देशानें खालील उपमा ( शहरी वाचकांच्या परिचयाची ) मुद्दाम दिली आहे.

मुंबई, सोलापूर वगैरे शहरांतील कारखान्यांशीं ज्यांचा संबंध येतो त्यांत मुख्यत: खालील तीन वर्ग पडतात.

( १ ) भांडवलदार मालक, किंवा डिव्हिडंड घेणारे बडे भागीदार ( Large Share-holders ) व मुख्य चालक ( Directors ) वगैरे.

( २ ) पगारी नोकरवर्ग, अधिकारी, कारकून व उपरीक्षक ( Supervisory staff )

( ३ ) मुख्यत: शारीरिक श्रम करणारे कामकरी (Labourers).

त्याच धर्तीवर खेडेगांवांत जे वर्ग असतात त्यांची यादी खालीं दिली आहे. वरील तीन वर्गांचें एकमेकांशीं ज्या प्रकारच नातें किंवा संबंध असतात. जवळ-जवळ तसल्याच प्रकारचे संबंध खेडेगांवांतील खालील वर्गांचे असतात:—

खालील "क, ख, ग" मध्यें जमिनीच्या एकराचे आंकडे दिले आहेत ते मुख्यत: महाराष्ट्रांतील दुष्काळी भागास व तेथील कोरडवाहू शेतीस योग्य जमिनीस लागूं पडतील असे आहेत.

तसेंच "क, ख, ग" ह्या खालील वर्णनांत "जमिनीचा मालक" असा शब्द आला आहे; त्यांतच तितक्याच क्षेत्राच्या जमिनीचा "मालक वा खंडकरी" व त्याच्या कुटुंबांतील व्यक्ति आल्या.

( क ) मोठी शेती असणारा ( ५० ते १०० एकर व मुख्यत: १०० एकरांचे वर ) मालक; ( तसेंच पूर्वकाळचे सावकार )

( ख ) मध्यम क्षेत्राच्या शेतीचा मालक ( ५ ते ५० एकरांपर्यंत )

( ग ) बिगर-शेती जनता वा एकरापेक्षा कमी (किंवा मुख्यत: मुरमाड ) जमिनीचे मालक.

दलितवर्गा ( हरिजन ) तील बहुसंख्य या शेवटच्या सदरांत पडतात व दुष्काळी वर्षांत उपाशी राहातात म्हणून अन्न अन्न ऐकतों ते मुख्यत: याच दलितवर्गांतील ! अन्नान्नस्थितीमुळें मृत्युमुखीं पडल्याबद्दल जें आपण ऐकतों तें मुख्यत: याच वर्गांतील जनतेसंबंधीं ! ह्या बिगर-शेती किंवा अपुरी शेती असणाऱ्या वर्गाची ( दलित-वर्ग सोडून सुद्धां ) संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

वरील पैकी "क" वर्गांतील लोक शेतावर स्वत: राबत नाहींत हें सांगावयास नको. "धान्यतुटी"चा फक्त एक शब्द म्हणूनच त्यांच्याशीं संबंध येतो. त्या वर्गांपैकी ज्यांच्याकडे ( कायमचें म्हणा वा आळीपाळीनें पण दीर्घकाळ ) खेडेगांवचें मुख्य अधिकारपद असतें, त्यांचें खेडेगांवांतील महत्त्व भलतेंच मोठें असतें. त्यांची शेती ते मजूरवर्गाकडून रोजंदारीनें करून घेतात. कागदोपत्रीं जरी ते शेतकरी म्हणवून घेत असले तरी व्यवहारांत ते शारीरिक श्रम करीत नाहींत किंवा केल्यास सटी-सामासी हौस म्हणून करतात. एकाद्या कारखान्यांत वा कचेरींत कामगार लावणाराला महत्त्व असतें, तसेंच महत्त्व ह्या वर्गांतील इसमांना किंवा "ख" वर्गांतील त्यांच्या गुमास्त्यांना असतें. आधीं कोरडवाहू शेतीस मजूर लागतात थोडे; जे थोडे लागतात तेही पेरणीच्या व काढणीच्या वेळेस-वर्षांत सुमारें २० ते ३० दिवस; ते लावतांना सुद्धां, होतां होईल तों आपल्या ( जवळच्या वा दूरच्या ) नातेवाईकांना लावून घेण्याकडे सर्व समाजाचीच प्रवृत्ति असते तीच या "क व ख" वर्गांतहि असल्यास नवल नाहीं. कमी श्रमाचीं कामें असतात तीं ते साहजिकपणेंच अशा लोकांना मिळतात. "क" व "ख" वर्गांतील शिक्षित ( वा निमशिक्षित ) असतील त्यांचाच आवाज ( वा ओरड ) शहरांतील पुढाऱ्यांपर्यंत येऊन पोंचतो. कामधंदा न मिळाल्यामुळें उपाशी रहाणारा जो "ग" वर्ग तो निर्धन व अत्यंत गरजू ! त्यांच्यापैकीं ज्या थोड्यांना खेड्यांतील शेतीवर काम मिळतें तें अत्यंत श्रमाचें व अपुरें, व आपसांतील चढाओढीमुळें कमी दरांत. अशा लोकांच्या अडचणींना वाचा फुटण्यास मार्गच नसतो. खेडोंपाडीं सार्वजनिक विहिरींवर पाणी भरणाचा त्यांचा हक्क कायद्यांत नमूद असला तरी प्रत्यक्षांत तो हक्क बजावण्याची त्यांची छाती नसते. तोच प्रकार इतर बाबतींतहि आढळतो.

बंधारे व लहानमोठे कनाल काढल्यानें फायदा होतो तो मुख्यत: वरीलपैकी "क" व "ख" वर्गाचा; मात्र खरी उपासमार होते ती "ग" वर्गाची !! मृत्यूच्या मगरमिठींतून सोडविण्याकरितां दुष्काळी कामें पाहिजेत तीं मुख्यत: या "ग" वर्गांतील जनतेला. वर वर्णन केलेली स्थिति नीट समजल्याशिवाय दुष्काळ-निवारण्याचे योग्य उपाय अमलांत येणार कसे ? श्रीमंतांची तरफदारी करणारे जसे त्यांचे कारकुनी पेशाचे मध्यमवर्गीय नोकर असतात त्याच धर्तीवर खेडेगांवांतील बड्या जमीनदारांची तरफदारी करणारे कांहीं मध्यम-शिक्षित त्यांच्या आश्रयाखालीं असतात. "धान्यतुटीकरितां कालवे पाहिजेत" वगैरे प्रकारची मागणी ते करीत रहातात व ज्या बड्या जमीनदारांचा त्यापासून फायदा होतो ते आपल्या मदतनिसांच्या मेहनतीचें कौतुक तर करतातच, शिवाय त्यांस थोडीफार आर्थिक मदतहि करतात. ही साऱ्या जगाचीच रीत आहे; त्यामुळें खेडेगांवेंच अपवाद कशीं व कां असतील ? मात्र दुष्काळ-पीडित

† टीप:—प्रस्तुत लेखकाचा खालील निबंध पहा.

"A Note for Making up Food-shortage in the State of Bombay." Journal of the Institution of Engineers (India); Volume 32 for March 1952.

* शिवाय तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, महाराष्ट्र-कर्नाटक भागांच्या भौगोलिक रचनेमुळें व पाण्याच्या अनिश्चिततेमुळें, एकंदर क्षेत्रापैकीं, ८ ते १५ टक्के जमिनीलाच कालवे मिळूं शकतील. दुष्काळ निवारणावर कालवे हाच तोडगा म्हणून घटकाभर मान्य केलें तरी उरलेल्या ८०-९० टक्के क्षेत्राच्या दुष्काळ-निवारणाला तो उपाय गैरलागू !

जनतेकरितां. कालवे-बंधारे पाहिजेत म्हणून अर्ज-विनंत्या व जोराच्या चळवळी करणारांनीं मुद्दां त्यायोगें मुख्यतः आपलाच स्वार्थ साधणार आहे, हें पक्कें समजून-उमजून तशी मागणी करणें हें त्यांच्या दृष्टीनें योग्य असलें तरी कनालवर सार्वजनिक भांडवल खर्च करण्यानें दुष्काळनिवारणाचे (अर्थात् अन्नार्थी भुकेल्यांना अन्न पुरविण्याचें) उद्दिष्ट त्यायोगें साध्य होईल कीं नाहीं याकडे नीट लक्ष देण्याची जबाबदारी मुख्यतः अधिकारपदें भूषित करणाऱ्यांचेवर असून, इतर जनतेनेंहि त्यांत लक्ष घातलें पाहिजे.


कारखान्यांतील कामगारांची तरफदारी करणारा पुढारीवर्ग (Labour Leaders) जसा शहरांत निर्माण झाला आहे, त्या धर्तीवर खेडेगांवांतील बिगरशेती कामकऱ्यांचा पाठीराखा वर्ग निर्माण झालेला दिसत नाहीं. या व अशाच कारणांमुळें शहरवासीयांची समजूत असते, कीं दुष्काळांत हाल होतात ते मुख्यतः शेतकऱ्यांचे. खेड्यांत बिगरशेती कामकरी वर्ग असतो व अन्नाविना मरतात ते त्या वर्गांतले, हें कोणांस फारसें माहितच नसतेसें दिसतें!!

अशा प्रकारें विपन्न व अन्नान्नदशेस पोंचलेले बहुतेक लोक (कांहीं तरुण इसम गांव सोडून मुंबई-सोलापूरसारख्या ठिकाणीं जातात, असले अपवाद सोडून) मूळ गांवींच राहून कसेंबसें कालक्रमण करीत असतात. खेडोंपाडीं बड्या जमीनदारांच्या घरीं धान्यानें भरलेल्या पोत्यांच्या ठिगींच्या ठिगी पडल्या असल्या तरी तें धान्य या विपन्न व बिगरजमीन जनतेस मिळण्याची कांहींच सोय* नसते. मोठी जमीन असणारा शेतमालक कोरडवाहू शेतावर मजूर लावतो ते मुख्यतः पेरणी व कापणीच्या वेळेस व कधींमधीं नांगरटीकरितां व क्वचित् ताली-बांध यांच्या दुरुस्तीकरितां. पण असलें जुजबी काम वर्षांतून फारतर ३०-४० दिवस. वर्षांतील इतर ३०० पेक्षा जास्ती दिवसांत, अशा बिगरजमीन जनतेस काम नाहीं! तसेंच स्वतःची जमीन नसल्यामुळें घरचा दाणाहि नाहीं. मोठ्या जमीनवाल्यांची बागाईत (विहिरी वगैरेवरची) शेती थोडी, त्यामुळें तीवर मजूर लागतात ते संख्येनें फारच थोडे.

सुमारें दोन महिन्यांपूर्वीं नामदार डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं एक वक्तव्य केलें, त्यांत सांगितलें कीं "पूर्ण-दुष्काळी वा निम-दुष्काळी परिस्थिति निर्माण होते ती धान्य कमी म्हणून नव्हे तर गरीब जनतेस तें विकत घेण्याची ताकदच नसते म्हणून." या वक्तव्यामागें मोठा अर्थ भरलेला आहे. हे उद्गार फार महत्त्वाचे व वस्तुस्थिति-निदर्शक आहेत, दुष्काळनिवारणाचें खरें निदान एरील विचारांतच आहे; व म्हणूनच लेखाचे प्रारंभीं ते उद्धृत केलें होतें.

वरील निदान न कळतां, दुष्काळावर उपाय म्हणजे धान्योत्पादन व त्याकरितां कालवे (मग ते कोणत्याहि तऱ्हेचे असोत) बांधणें म्हणजे उजव्या हाताला जखम झाली असतां, डाव्या हातावर शस्त्रक्रिया करण्यासारखें आहे. याहींपेक्षा योग्य उपमा द्यावयाची तर दुष्काळ-निवारणास नीरे-प्रवरे सारखे बारमाही कालवे काढा म्हणणें म्हणजे खेडेगांवांतील जनतेस साक्षर करावयाचें या उद्देशानें तेथें फर्ग्युसन किंवा वाडिया कॉलेज-सारख्या इमारती बांधुन त्या दर्जाचे प्राध्यापक व व्याख्यानें यांचा तांडा तेथें न्या असें सांगण्याइतकें हास्यास्पद द्रव्याचा दुरुपयोग करणारें व अव्यवहार्य होय.

*धान्याच्या निर्यातीस आजवर बंदी होती तिचा थोडा अप्रत्यक्ष उपयोग दुष्काळनिवारणाचे बाबींत होत असे.

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum


मुख्य अडचण वर सांगितलीच कीं, अशा बिगर-शेती जनतेला कामच मिळत नाहीं. तें काम पुरविण्याची व्यवस्था काय व कशी करतां येईल, हीच कठीण समस्या आपणांस सोडविली पाहिजे. ती जोंवर सुटत नाहीं किंवा जोंवर ती सोडविण्यास योग्य असलेला मार्ग चोखाळण्याची जनतेची तयारी नाहीं, तोंवर नुसती अन्नधान्याची निपज वाढविण्यानें काय होणार? धान्य पुष्कळ वाढविल्यानें तें स्वस्त होईल व उपाशी जनतेस तें विकत घेणें शक्य होईल ही कल्पनाच अव्यवहार्य ठरली आहे. धान्य स्वस्त झालें तरी तें विकत घेण्याइतकी क्रयशक्तिसुद्धां अगदीं खालच्या (अर्थात् बिगर-जमीन) जनतेस नसते. शिवाय, धान्य वाढविणारा शेतमालक तो आपल्या कुटुंबास पेरणी-काढणीच्या वेळेपुरत्या लागणाऱ्या शेतमजुरांस लागतें तितकेंच (मात्र दुष्काळाची साल धरून) धान्य उत्पादन करतो. त्यापेक्षा जास्ती धान्योत्पादन करण्याची त्याला आंचच नसते. फक्त ज्या थोड्या शेतमालकांना किंवा खंडकऱ्यांना काळा-बाजार करण्याची उमेद व ताकद असते ते त्या मानानें धान्योत्पादन करतात; पण त्यापेक्षा जास्त नाहीं. त्यामुळें दुष्काळी मुलुखांत कालवे काढल्यानें दुष्काळ-निवारण तर राहोंच पण सार्वजनिक खर्चाच्या (भांडवली वगैरे) मानानें जादा धान्योत्पादनहि होत नाहीं, हें सोलापूर जिल्ह्यांतील कालव्यांच्या प्राप्तांका (Data) वरून आपण पडताळून पाहिलेंच आहे.

"दुष्काळी जिल्ह्यांत धान्य-तूट तर नव्हेच उलट जादा धान्य निपज होते; इतकेंच नव्हे तर तेथून धान्य निर्यात होतें" हें कोडें नसून तें वरील विवेचनाला धरूनच आहे. दुष्काळी प्रदेशांत जनतेचा खालचा थर अर्धपोटी असतो व कसाबसा जगतो. त्याच्या उलट शारीरिक श्रम कमी (कारण त्यांचें काम मुख्यतः उपरीक्षकाचेंच असतें) असणाऱ्या खेडूत जनतेच्या वरच्या थरांतील कुटुंबांतील व्यक्तींचा आहार, बिगर-शेती मजुरांच्या दोन-तीन (किंवा अधिक) पट असतो. कारण, शेत त्यांच्या मालकीचें व त्यावर होणाऱ्या धान्यावर मालकीहि त्यांची. शहरांत संपत्तीची विषम वाटणी असते, त्याच धर्तीवर खेड्यांत धान्याची विषम वाटणी असते. अधून मधून पडणाऱ्या निम-दुष्काळी व दुष्काळी परिस्थितीवरून पण वरील विचारसरणी लक्षांत न घेतां काढलेलें, धान्यतुटीचें निदान, प्रत्यक्षांत होणाऱ्या धान्यनिर्यातीवरून खोटें ठरलेलें आपण प्रत्यक्षांत पहातोंच. अशा प्रदेशांत "कनाल काढून धान्यवाढ करणें" व "भुकेलेल्यांचे अस्थिपंजर पाहून, त्यावर उपाय म्हणून मेदवृद्धि झालेल्या श्रीमंतांना कॉड-लिव्हर ऑईल देऊन त्यांचया अंगावरील चरबी वाढविणें," सारखेंच!!

## मोटारींचें उत्पादन, कर आणि आर्थिक सुधारणा

१९५० च्या पहिल्या सहामाहींत ग्रेट ब्रिटननें २,६२,५०७ मोटारी तयार केल्या, फ्रान्सनें १,२२,७९९ मोटारी केल्या आणि जर्मनीचें उत्पादन ९२,४१६ मोटारींचें झालें. म्हणजे, ग्रेट ब्रिटनमध्यें दर आठवड्यास १०,१५० मोटारी बनत होत्या, तर फ्रान्स आणि जर्मनी मिळून दर आठवड्यास ८,३०० मोटारी करूं शकत होते. १९५२ च्या दुसऱ्या सहामाहींतील परिस्थिति अगदीं भिन्न आहे. ब्रिटिश गाड्यांचें उत्पादन दर आठवड्यास ८,८०० पर्यंत खालीं आलें आहे पण फ्रेंच व जर्मन उत्पादनाचा आकडा १३,००० मोटारींपर्यंत चढला आहे. जर्मन आणि फ्रेंच मोटारींची स्पर्धा ब्रिटिश कारखानदारांना जाणवूं लागली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें अनेक मॉडेल्सच्या मोटारी बनविल्या जातात, तर फ्रान्स व जर्मनी कांहीं मोजक्या मॉडेल्सवरती लक्ष केंद्रित करतात. त्यामुळें, दर माणशीं दर ताशीं मजुरी त्यांना कमी पडते. त्यांची यंत्रसामुगी ब्रिटिश यंत्रसामुग्रीच्या तोडीची आहे आणि तेवढ्याच यंत्रसामुग्रीपासून ते देश अधिक उत्पादन काढूं शकतात. युद्धोत्तर काळांत ब्रिटिश मोटारींना परदेशांत असलेली मागणी आतां कमी झाली आहे आणि ब्रिटिश मोटारींच्या किंमती उतरविल्याखेरीज ब्रिटिश मोटारींची निर्यात टिकून रहाणार नाहीं. निर्गत होणाऱ्या ब्रिटिश मोटारींची किंमत कमी केली, तर खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें मोटारींचा खप वाढवून त्याच्या पैशांतून 'ओव्हरहेड' खर्चास मदत होण्याची व्यवस्था झाली पाहिजे. मोटार–मालकांची संख्या वाढवावयाची असेल, तर कराचा बोजा उतरविला पाहिजे. मोटार बाळगण्याच्या खर्चांत करामुळें ६०% वाढ होते, आणि ह्या करापासून ३३·५ कोटी पौंड उत्पन्न सरकारी तिजोरीला मिळतें. सरकारच्या रस्त्यासाठी खर्चाच्या वाट्याच्या १० पट ही रक्कम भरते. मोटारमालकास मोटार ठेवणें परवडलें तरच मोटारींचा खप वाढणार हें उघड आहे. मोटारींच्या वापरास ग्रेट ब्रिटनमध्यें उत्तेजन मिळालें, तर मोटारींचा धंदा वाढेल, रस्ते सुधारतील, ज्यास्त लोकांना रोजगार मिळेल, इंजिनिअरिंग धंद्यांत सुधारणा होईल, परराष्ट्रीय हुंडणावळ मिळवता येईल आणि इंग्रजांच्या रहाणीचा दर्जा वाढेल, असें तेथील कारखानदारांचें म्हणणें आहे.

### रोख्यांची लवचिक किंमत

रहाणीच्या खर्चाचें मान ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत रोख्याची किंमत वाढावी, परंतु दर्शनी किंमतीच्या खालीं ती कधींच जाऊं नये, असे रोखे पैसे गुंतविणारांना कितीतरी आकर्षक वाटतील! ग्रेट ब्रिटनमधील एका मॅग्नेशिअम कंपनीच्या नोकरांच्या वाट्यास हें सुदैव आलें आहे. शिलकी रोजगाराच्या ऐवजीं कंपनी त्यांना रोखे देईल आणि प्रत्येक सहा महिन्यांनीं त्यांची किंमत रहाणीच्या खर्चाच्या मानानें ठरविली जाईल, अशी योजना आहे. व्याजाचा हिशेबहि त्याच पद्धतीनें केला जाईल. दुसऱ्या एका कंपनीनें प्रत्येक कामगारास त्याच्या वाढदिवसाच्या दिवशीं पगारी रजा देण्यास प्रारंभ केला आहे. ह्या दोन्ही गोष्टी कंपन्यांच्या मर्जीवर अवलंबून नसून, तसे कामगार संघांबरोबर त्यांचे करार झालेले आहेत.

---

**गुन्हेगारानें दिलेली देणगी**—वारंगळ येथील मध्यवर्ती तुरुंगांत शिक्षा भोगीत असलेल्या मोहिउद्दीन नांवाच्या कैद्यानें तुरुंगाच्या वाचनालयासाठीं अधिक पुस्तकें घेण्यासाठी १,००० रुपयांची देणगी दिली आहे.

## कष्ट, दृढनिश्चय आणि कर्तृत्व

लेखकः– के. बी. सांठे, पुणें

परवां मी पुण्यांतील एका सरकारी ऑफिसांत सहज कामासाठी गेलों होतों. उद्यमराव हेडक्लार्कचे टेबलासमोर लोकांची मोठी रीघ लागलेली होती. उद्यमराव घामाघूम होऊन पण आस्थेनें प्रत्येकाचें काम पहात होते. इतर चार-पांच कारकून आपले टेबलापुढें स्वस्थ बसलेले होते. त्यांतील एक कारकून श्रीयुत पिटपिटे माझ्या थोड्या परिचयाचे होते म्हणून मी त्यांना विचारलें,

"काय पिटपिटे, आज बरीच गर्दी दिसतेय? कांहीं विशेष?"

"रोज मरे त्याला कोण रडे? ही गर्दी रोजचीच आहे आणि ती आमच्या आंगवळणी पडली आहे" पिटपिटराव बोलले.

"तुम्हीं तर हात जोडून स्वस्थ बसलाय. त्या उद्यमरावांचे मदतीस कां जात नाहीं?" मी चवकशी करण्याच्या दृष्टीनें व पिटपिटरावांच्या ऑफिसमधील सहकार्याच्या कल्पना काय आहेत हें काढून घेण्यासाठीं जरा सोंचून विचारलें.

"वा महाराज, अहो मला त्यांच्यासारखा साडेतीनशे रुपये पगार मिळतो आहे का? तो जर मिळाला तर माझें काय जातें त्याच्यासारखे कष्ट करायला" पिटपिटराव म्हणाले.

पुष्कळ अंशानें हीच आळसाची व बिनमाणुसकीची घातक वृत्ति आपणांस आज सर्व सरकारी ऑफिसेस, रेल्वेज व बँकांतील नोकरवर्गांत प्रामुख्यानें दिसून येत आहे. त्या कारकुनांचा उद्यमराव हेडक्लार्कच्या मोठ्या जागेवर डोळा आहे. पण ती जागा मिळवायला उद्यमराव हेडक्लार्कनें जे कष्ट, दृढनिश्चय आणि कर्तृत्व दाखविलें तें दाखविण्याची या आळशी कारकुनांची बिलकुल तयारी नाहीं; उलट स्वस्थ बसण्यांतच त्यांना सुख वाटतें.

ही वृत्ति मासे मारणाऱ्या कोळ्यासारखी आहे. मासे धरीत असतांना त्याच्या जाळ्यांत मासे सांपडले म्हणून त्याला भोंवतालच्या बघे लोकांनीं सांगितलें, तेव्हां तो म्हणाला, "होय, मला माहीत आहे." त्यावर पुनः लोकांनीं "माहीत आहे तर तूं ते जाळ्यांतून काढीत कां नाहींस" म्हणून विचारलें, त्यावर तो आळशी कोळी म्हणाला "हे मासे जर मी बाहेर काढले तर माझें काम कितीतरी वाढेल. मला आमिषाचे तुकडे पुनः जाळ्यांत टाकावे लागतील, ते मासे स्वच्छ करून घरीं न्यावे लागतील, मग चूल पेटवून ते पकवावे लागतील, वगैरे वगैरे."

पुष्कळ लोकांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं, मोठमोठ्या धंद्यांचे कर्णधार अगर ऑफिसमधील बडे अधिकारी यांनीं वर्षानुवर्षं कष्ट करून, झीज सोसून व सस्ता खाऊन ते या मोठ्या जागेवर आलेले असतात व या जागेवर येतांच त्यांनीं आपल्या कर्तृत्वाचीहि जाणीव जगाला करून दिलेली असते. ह्या त्यांच्या अंतिम यशाचें रहस्य त्यांच्या कष्टांत, दृढनिश्चयांत आणि कर्तृत्वांत असतें.

म्हणून कारकुनासारख्या अगर शिपायासारख्या कनिष्ठ जागेवर काम करणाऱ्या लोकांना लठ्ठ पगार व मोठमोठ्या हुद्यांच्या जागा जर हव्या असल्या तर त्यांनीं कष्ट करून आपल्या बुद्धिमत्तेनें, सहकार्यानें आणि कर्तृत्वानें त्या हुद्यावर जाण्याचा प्रयत्न करावा; वरच्या अधिकाऱ्यांशीं असहकार करून अगर त्यांची निंदा करून नव्हे.

आपल्या ऑफिसांत अगर आपल्या कार्यक्षेत्रांत वरच्या पदावर जाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारांनीं त्यासाठीं कष्ट, दृढनिश्चय आणि कर्तृत्व या सोपानत्रयीचा खात्रीचा आणि जवळचा मार्ग पत्करला पाहिजे.

### भारतामधून काजूंची निर्यात

भारतामधील काजूंना अमेरिकेंत असलेली मागणी सध्यां मंदावली आहे. ब्रिटनकडून मात्र अधिकाधिक मागणी येत आहे. आजपर्यंत ब्रिटनला कधींहि झाली नव्हती एवढी मोठी काजूंची निर्यात चालू वर्षी होण्याचा संभव आहे. ब्रिटनच्या काजूंच्या मागणीमुळें भारतांतील काजूच्या किंमती टिकून राहिल्या आहेत. ज्या दर्जाच्या काजूच्या एका पौंडाला वर्षापूर्वी ९ शिलिंग पडत असत, त्याच काजूंना आज ११ शिलिंग भाव येत आहे. आफ्रिकेच्या न फोडलेल्या काजूच्या बियांना गेल्या वर्षी टनामागें ७३० रुपये भाव येत असे आणि भारतीय काजूंना टनामागें ७८० रुपये भाव येत असे. आज ह्याच किंमती अनुक्रमें ९२५ रुपये आणि ९३० रुपये अशा आहेत. १९५२ सालीं भारतांतील काजूंचें एकूण उत्पादन ५६,५०० टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे, हें पीक १९५१ च्या मानानें ६ टक्क्यांनीं कमी आहे. भारतामधील काजूंचें उत्पादन निर्यातीच्या मागणीच्या मानानें नेहमींच कमी पडतें; म्हणून आफ्रिकेंतून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर काजूंची आयात करण्यांत येते. आफ्रिकेंत यणारें काजूचें फळ भारतीय फळापेक्षा लहान असतें आणि तें कमी प्रतीचेंहि समजलें जाते. आफ्रिकेंतून [illegible] केलेल्या काजूंवर संस्करण करून ते भारतीय काजूंत मिसळण्यांत येतात आणि नंतर निर्यात केले जातात. चालू वर्षी आफ्रिकेंतून भारतांत ६४,००० टन काजू आयात केला जाईल असा अंदाज आहे. ही आयात आणि भारतामधील उत्पादन मिळून चालू सालीं १,२०,००० टन काजू निर्यात केला जाईल असें दिसतें. न फोडलेल्या काजूंचें वजन फोडलेल्या काजूंपेक्षा अर्थात्‌च कमी असतें. फोडलेले काजू अथवा गर हे सुमारें ३०,१२५ टन वजनाचे निर्यात होतील. गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेकडून कच्च्या मालाला येणारी मागणी घटत चालली आहे. इतर कच्च्या मालाप्रमाणेंच काजूंची मागणीहि कमी झालेली दिसते.

---

### इंग्रजांच्या प्राप्तीचा विनियोग

इंग्लंडमध्यें खर्च होणाऱ्या प्रत्येक २० शिलिंगापैकी अन्नावर ५ शि. ९ पे. खर्च होतात, कपड्यासाठी २ शि. १ पे. लागतात, दारू व तंबाखू ह्याप्रीत्यर्थ ३ शि. ३ पे. खर्ची पडतात आणि सर्पण, दिवाबत्ती, घरगुती जिनसा, प्रवास, पुस्तकें, इत्यादींसाठी सुमारें ९ शिलिंग उरतात. गेल्या वर्षी ब्रिटिश नागरिकांनीं मिळवलेल्या उत्पन्नांतील प्रत्येक पौंडापैकी १६ शि. १० पे. नागरिकानें स्वतःसाठी खर्च केले, २ शि. १० पे. प्रत्यक्ष कराचे रूपानें सरकारला दिले आणि ४ पे. त्याच्या वैयक्तिक बचतीसाठीं उरले. ब्रिटिश राष्ट्राची एकूण बचत ह्या आकड्यानें दिसणाऱ्या रकमेपेक्षा मोठी आहे; इतर मार्गांनीं घडवून आणलेली बचत ह्या आकड्यांत समाविष्ट नाहीं.

---

### चितगांव-नारायणगंज कालवा ?

चितगांव बंदर आणि नारायणगंज हीं शहरें कालव्यानें जोडण्याची योजना कितपत व्यवहार्य होईल, ह्याचा पाकिस्तान सरकार विचार करीत आहे. सध्यां त्यांचेमध्यें ३०० मैलांचें अंतर आहे, तें ह्या कालव्यामुळें निम्म्यावर येईल. ह्या कालव्यांतून बाराहि महिने वहातूक करतां यावी अशी अपेक्षा आहे. कालव्याच्या योजनेस ६ कोटी रुपये खर्च येईल व तिपेरा, नवखली आणि चितगांव ह्यांचेमधील दळणवळण कालव्यामुळें पुष्कळच सुधारेल.


# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुत्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर



# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## —संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

**मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.**

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.